

**डॉ. विलास जाधव**

सांगली

mauliayurved97gmail.com

# साधेपणाचे सामर्थ्य

साधेपणा हा अनेकदा दुर्बलतेचा समानार्थी मानला जातो; परंतु प्रत्यक्ष जीवनात तोच साधेपणा दीर्घकाळ टिकणाऱ्या कार्याचा, शांत आत्मबळाचा आणि निःस्वार्थ सेवेचा सर्वात भक्कम पाया ठरतो. आयुर्वेदाचार्य, अध्यापक, समाजभान जपणारे सहकारनेते, गोसंवर्धनाचे साधक आणि वैदिक-सांस्कृतिक कार्याचे वाहक अशी बहुआयामी ओळख असूनही, डॉ. विलास जाधव यांनी आपल्या कार्याला व्यक्तिकेंद्री प्रसिद्धीचे कोंदण चढू दिले नाही. ग्रामीण संस्कारांतून घडलेले बालपण, संतपरंपरेचा वारसा, आयुर्वेद या सर्व प्रेरणेतून साकारलेले डॉ. जाधव यांचे जीवनकार्य म्हणजे अपार समाधान आणि संपूर्णतेने जागृत उदाहरण.

मानवी जीवन हे अल्पायुष्याचे, क्षणभंगुर आणि अनेकदा गोंधळात टाकणारे असते; तरीही या अस्थिरतेतूनच काही मोजक्या जणांना जीवनाचा खरा अर्थ गवसतो. पद, प्रतिष्ठा, संपत्ती किंवा बाह्य यश यांमध्ये नव्हे, तर नित्याच्या साध्या जगण्यात, कर्तव्याच्या शांत पालनात आणि सेवाभावाने केलेल्या कर्मात जे सामर्थ्य दडलेले आहे, त्याची जाणीव ही अनुभवातूनच येते. हे लेखन कोणत्याही असामान्य कर्तृत्वाचा गाजावाजा करण्यासाठी नसून, एका सामान्य माणसाने चाललेल्या वाटेवर भेटलेल्या संतविचार, संस्कार, सेवा आणि साधना यांतून साधेपणाचे सामर्थ्य कसे उलगडत गेले, याचा प्रामाणिक मागोवा आहे. या प्रवासात कधी ज्ञानेश्वर माऊलींचे शब्द आधार झाले, कधी आयुर्वेदाच्या ऋषीपरंपरेने दिशा दिली, तर कधी कुटुंब, समाज आणि कर्तव्य यांनी जीवनाला अर्थ दिला. या सर्वांतून एकच प्रश्न मनात सतत उभा राहिला. खरे सामर्थ्य नेमके कुठे आहे? त्या प्रश्नाचे उत्तर शोधत चाललेली ही जीवनकथा आहे. प्रत्येकाची पद्धत आणि दृष्टी वेगळी असली तरी आपल्या जीवनातील साधेपणाचा आपणच अर्थ शोधावा, अशीच ही अंतःकरणातून उमटलेली विनम्र सद्भावना आहे.

जगात तीन गोष्टी अत्यंत दुर्लभ मानल्या गेल्या आहेत; मनुष्यत्व, मोक्षाची इदंभावना आणि सत्संगाचा लाभ. ईश्वरकृपेने मानवदेह मिळाल्यानंतरही त्याचे सार्थक होणे, हे केवळ कृपा व संताशीर्वादानेच शक्य होते, अशी माझी ठाम धारणा आहे. ही जीवनसार्थकता कोणत्याही असामान्य बुद्धिमत्तेमुळे नव्हे, तर मिळालेल्या संधींचे कृतज्ञतेने केलेला स्वीकार आणि त्यातून घडलेली सेवा यामुळेच लाभली आहे, असा माझ्या अंतरात्म्याचा आवाज आहे. त्या अनुभवांची ही साध्या शब्दांत मांडणी आहे.

**'भरतखंडी नरदेह प्राप्ती ही तो भाग्याची संपत्ती!'**

इथे 'भा' म्हणजे ज्ञान आणि 'रत' म्हणजे रममाण होणे. ज्ञानात रममाण होणाऱ्या वैदिक-सनातन ऋषी-कृषी परंपरेतील भारतभूमीत; त्या भारतातीलही संतपरंपरेचा वारसा लाभलेल्या महाराष्ट्रात; महाराष्ट्रातील त्रिभुवनपावन, पंचक्रोश क्षेत्र असलेल्या नेवासे भूमीत ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वरीची निर्मिती केली, त्या अहिल्यानगर जिल्ह्यात; त्यातही पाराशर ऋषींची तपोभूमी व संत निळोबा महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेल्या पारनेर तालुक्यात; स्वयंभू भगवान हरेश्वर महाराजांच्या कृपाछत्राखाली, डोंगररांगांच्या कुशीत वसलेल्या श्री कर्जुले हरेश्वर या ग्रामीण भागात माझा जन्म झाला.

वारकरी सांप्रदायिक संस्कार असलेल्या, सुशिक्षित पण सामान्य परिस्थितीतील शेतकरी कुटुंबात सौ. सरस्वती आणि श्री विष्णू या माता-पित्यांच्या पोटी, एकत्र कुटुंबातील अकरा भावंडांच्या गोकुळात माझे बालपण गेले. घरात नामस्मरण, वारी, हरिपाठ आणि श्रम यांची सांगड होती. पिताश्री शेतवस्तीपासून चार-पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या वासुंदे येथे शिक्षक असल्यामुळे आमचे प्राथमिक ते माध्यमिक शिक्षण तेथेच झाले. नित्याच्या दहा किलोमीटर पायदळ प्रवासाने शाळा गाठावी लागे. या श्रमांनी शरीरासोबत मनालाही शिस्त मिळाली.

बालपण शेतात गेल्याने शेतीतील सर्व छोटी-मोठी कामे आत्मसात झाली होती. दहावीनंतर सैन्यात जाण्याचा मानस होता; परंतु आयुष्यात काही विशेष घडले नाही तरी उत्तम शेतकरी होऊ, हा आत्मविश्वास होता. मात्र कुटुंबातील एका ज्येष्ठ बंधूंनी आयुर्वेदाचे शिक्षण घेऊन

वैद्यकीय सेवा सुरू केली होती. माझाही जीवनप्रवास त्या मार्गाने व्हावा, अशी कुटुंबीयांची इच्छा होती. त्या इच्छेनेच पुढील वाटचालीस दिशा मिळाली.

## श्रीगणेशा अक्षरवाङ्मयाचा

स्वल्प शैक्षणिक गुणवत्तेच्या आधारे अहिल्यानगर येथील पंचानन कै. गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळाली. याच काळात कर्जुले हरेश्वर ग्रामातील, वाराणसी येथे संस्कृत, अध्यात्मविद्या व संतवाङ्मयाचा सखोल अभ्यास केलेले ह.भ.प. वेदांताचार्य तुकाराम महाराज शास्त्रीजी नगर येथे श्रीमद्भगवद्गीता प्रवचनमालेसाठी येत असत. बालपणी ऐकलेले गीतेचे श्लोक त्यांच्या सुस्पष्ट विवेचनामुळे अंतःकरणात नव्याने उतरले आणि जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलली. त्याच काळात शास्त्रीजींकडून 'राम कृष्ण हरी' मंत्र व 'तुलसीमाला' धारण करून वारकरी संप्रदायाची दीक्षा घेतली. तेव्हापासून आजतागायत अध्यात्म स्वाध्याय मंडळाच्या शाखेचा संचालक म्हणून कार्य करत श्रीगीता ग्रंथसेवेचा अल्प योग लाभत आहे. ही सेवा कोणत्याही प्रदर्शनासाठी नव्हे, तर कृतज्ञतेतूनच घडत गेली.

इ.स. १९९२ च्या सुमारास जीवनाला कलाटणी देणारी घटना घडली. सिद्धेश्वर मांडवगण येथील श्री चव्हाण गुरुजी यांनी वयाच्या ६५–६६ व्या वर्षी श्री ज्ञानेश्वरीचे स्वहस्ते लेखन पूर्ण केल्याचे समजले. ही गोष्ट अंतःकरणाला खोलवर स्पर्शून गेली. त्या क्षणी श्री माऊलींच्याच कृपेने आपणही माऊलींच्या अक्षरवाङ्मयाचे लेखन करावे, असा दृढ संकल्प जागृत झाला. वैद्यकीय अभ्यासासोबत नित्य ५०–१०० ओव्या लिहीत हे कार्य संतकृपेने पूर्णत्वास गेले.

या लेखनानंतर आयुष्यभर लेखनसंस्कार अखंड राहिला. श्री ज्ञानेश्वरीनंतर श्रीमद्भगवद्गीता,



विष्णुसहस्रनाम, संत तुकाराम महाराजांची अभंगगाथा, आयुर्वेदीय बृहत्त्रयी संहिता, तसेच विविध आध्यात्मिक ग्रंथांचे सुलेखन झाले. सध्या श्री एकनाथी भागवत व श्री संत निळोबा महाराजांची अभंगगाथा लेखन सुरू आहे. ही वाङ्मयसेवा 'ब्रह्ममुहूर्ते उत्तिष्ठेत्' या आयुर्वेदीय उपदेशाचा अंगीकार, बालपणीची शिस्त आणि निष्ठा यांमुळे शक्य झाली.

## आयुर्वेद सेवा, सहकार व सामाजिक बांधिलकी

आयुर्वेदिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जीवनाचा मुख्य केंद्रबिंदू रुग्णसेवा हाच राहिला. वैद्यकीय व्यवसायाकडे कधीही केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहिले नाही. वैद्य हा समाजाचा ऋणी असतो, ही भावना मनात ठाम होती. त्यामुळे उपचार करताना औषधांइतकेच समुपदेशन, आहार-विहाराचे मार्गदर्शन आणि रुग्णाच्या मानसिक स्थितीकडे लक्ष देणे, हे उपचारपद्धतीचे अविभाज्य अंग बनले.

अहिल्यानगर येथे आयुर्वेद चिकित्सा सुरू असतानाच, सन १९९८ मध्ये आयुष्यात एक वेगळे वळण आले. वैद्यकीय क्षेत्रात स्थिरता असतानाही, समविचारी सज्जनांच्या सहकार्यातून सहकार क्षेत्रात प्रवेश करण्याचा निर्णय झाला. त्यातूनच ''स्वामी समर्थ सहकारी बँक लिमिटेड''ची स्थापना करण्यात आली. हा निर्णय वैयक्तिक महत्त्वाकांक्षेपोटी नव्हे, तर ग्रामीण भागातील सामान्य माणसाला विश्वासार्ह, पारदर्शक आणि मूल्याधिष्ठित आर्थिक सेवा मिळावी, या उद्देशाने घेतला होता.

प्रारंभी अडचणी, मर्यादित साधनसंपत्ती आणि जबाबदारीचे मोठे ओझे होते; तरीही प्रामाणिकपणा, शिस्त आणि विश्वास या त्रिसूत्रीवर काम सुरू राहिले. काळाच्या ओघात बँकेचे कार्य विस्तारत गेले आणि आज महाराष्ट्रातील विविध प्रांतांत सोळा शाखांद्वारे सेवा देण्याचे सौभाग्य लाभले आहे. या वाटचालीतील यश व्यक्तीचे नसून संघभावना आणि सहकार्याच्या मूल्यांचे आहे, अशी भावना मनात कायम राहिली.

सन २०१२ मध्ये निसर्गसृष्टी गोपालन संस्थेची स्थापना झाली. या संस्थेमार्फत ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांच्या नावाने लोकसहभागातून गोशाळेचे संचालन सुरू झाले. या गोशाळेत सध्या कसायांकडून सोडविलेले तसेच शेतकऱ्यांना सांभाळणे अशक्य झालेले, अशा ४५० हून अधिक गोधनाचे संरक्षण व संवर्धन केले जाते. सन २००५ पासून अल्प प्रमाणात हे कार्य सुरूच होते; मात्र संस्थात्मक स्वरूपामुळे ते अधिक संघटित आणि व्यापक झाले. गोसेवा ही केवळ प्राणीसंरक्षण नव्हे, तर ग्रामीण संस्कृतीचे रक्षण आहे, ही भावना या कार्यामागे सदैव प्रेरणादायी राहिली.

सन १९९८ -९९ दरम्यान ''कृण्वन्तो विश्वं स्वस्थम्'' हे ध्येय ठेवून सेवा, संशोधन, प्रचार व शिक्षण या चतु:सूत्रीद्वारा आयुर्वेदाचा प्रचार व प्रसार कार्यासाठी स्थापन झालेल्या अखिल भारतीय स्तरावरील संघटनेत स्थापनेपासून सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून जोडला जाऊन, क्रमाक्रमाने जिल्हा विभाग पातळीवर निष्ठेने काम करत ''राष्ट्रीय कार्यवाह'' या जबाबदारीच्या माध्यमातून आयुर्वेदशास्त्र सेवा करण्याचे भाग्य लाभले. आजही सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून संघटनेत कार्ययुक्त असल्याचे आंतरिक समाधान आहे.

सन १९९९ पासून संस्कृत विषयातील पदव्युत्तर शिक्षणाच्या आधारे आणि गुरुवर्यांच्या सहकार्याने शेवगाव येथील आयुर्वेद

महाविद्यालयात अध्यापन कार्य सुरू झाले. रुग्णसेवेबरोबरच नव्या पिढीला अल्प अनुभव देण्याचा योग लाभणे, हे ईश्वरकृपेचेच फलित मानतो. सप्ताहातील काही दिवस शेवगाव येथे अध्यापन आणि उर्वरित काळात चिकित्सा अखंडपणे सुरू आहे.

## संस्कार, सेवा आणि समाधान

अहिल्यानगर येथेच वैदिक प्रचार प्रतिष्ठान या संस्थेमार्फत वैदिक संस्कृतीच्या जतन व प्रचारासाठी वेदकथा, यज्ञकर्म, बालवयातील मुला-मुलींसाठी निवासी दहा दिवसांचे संस्कार शिबिर नियमितपणे आयोजित केले जाते. बालमनावर लहानपणीच संस्कार झाले, तरच सुदृढ समाजनिर्मिती शक्य होते, ही ठाम धारणा या कार्यामागे आहे. याच संस्थेअंतर्गत स्वामी विरजानंद दंडी कन्या गुरुकुल चालविले जाते. गेल्या दहा वर्षांपासून येथे शालेय शिक्षणासोबत भावी पिढीतील सुसंस्कृत नारीशक्ती घडविण्याचा प्रयत्न सुरू आहे. स्त्री ही केवळ कुटुंबाचीच नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या स्थैर्याचा आधारस्तंभ आहे, या विचारातून हे कार्य आकारास आले आहे.

जन्मभूमी श्री कर्जुले हरेश्वर येथे श्री हरेश्वर ग्रामीण विकास ट्रस्टच्या माध्यमातून विश्वस्त म्हणून विविध सामाजिक व आध्यात्मिक उपक्रम राबविले जात आहेत. देवस्थान मंदिर व परिसराचा विकास, सामाजिक प्रबोधनासाठी अखंड हरिनाम सप्ताह, आध्यात्मिक बालसंस्कार शिबिरे, जलसंधारणाची कामे, गीता स्वाध्याय वर्ग, वाचनालय तसेच गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत अशी ही कार्यमाळा अखंडपणे सुरू आहे.

याशिवाय भारतीय गोशाळा व संवर्धन संरक्षण बहुउद्देशीय समिती, आळंदी (पुणे) या संस्थेचा संस्थापक विश्वस्त म्हणून, तसेच अहिल्यानगर जिल्हा वाचनालय, विविध धार्मिक संस्था, श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट आणि विचार भारती संस्था अहिल्यानगर यांच्या सामाजिक उपक्रमांत सक्रिय सहभाग राहिला आहे. जेथे शक्य आहे तेथे वेळ, विचार आणि श्रम अर्पण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरू आहे.

खरं तर बालपणापासूनच असे वाटत आले आहे की, मनुष्यजीवन केवळ स्वार्थासाठी नसून, सर्वार्थाने परमार्थासाठी आहे. ''देवे दिला देह भजना- सेवार्थ गोमटा'' हे वाक्य केवळ उच्चारापुरते न राहता जीवनव्रत बनले. हा लेख आत्मप्रौढीचा नसून, जे जसे घडले त्याचा साधा, प्रांजळ लेखाजोखा आहे. ''काम जादा, बाते कम'' या भावनेतून जे समजले अन् जे वर्तले तेच मांडण्याचा हा प्रयत्न आहे.

## मागे वळून पाहताना

आज मागे वळून पाहताना स्पष्टपणे जाणवते की, या दीर्घ जीवनप्रवासात मोठेपणा, पद, प्रतिष्ठा किंवा प्रसिद्धी यांचा कधीही आग्रह नव्हता. जे आले ते सहज स्वीकारले आणि जे करणे आले ते कर्तव्यभावनेने केले, इतकेच. खरे सामर्थ्य हे आवडंबरात, शब्दांच्या चमत्कारात किंवा गाजावाजात नसून, नित्याच्या साध्या कृतींमध्ये, शिस्तीत, सेवेत आणि सातत्यात दडलेले आहे, हेच अनुभवातून उमगले.

पहाटेचा ब्राह्ममुहूर्त, थोडेसे वाचन, थोडी सेवा, थोडे श्रम, थोडे मौन आणि मनात सतत 'आपण केवळ निमित्त आहोत' ही भावना यातूनच जीवनाची दिशा ठरली. साधेपणाने जगल्यामुळे अपेक्षा कमी राहिल्या आणि म्हणूनच दुःखाचे ओझे हलके झाले; कर्तव्याशी निष्ठा ठेवल्यामुळे कामात आनंद मिळत गेला.


आयुष्याने जे काही दिले, ते स्वतःपुरते न ठेवता समाजासाठी अर्पण करण्याचा प्रयत्न झाला, इतकेच या प्रवासाचे सार आहे.

संतांनी सांगितलेले 'बोले तैसा चाले' हेच साधेपणाचे खरे सामर्थ्य; विचार, शब्द आणि कृती यांची एकरूपता. या साध्या वाटेवर चालताना जे समाधान, जे आत्मबळ आणि जी शांतता लाभली, तीच या जीवनाची खरी संपत्ती आहे; आणि तीच वाचकांनी आपल्या जीवनात अंगीकारावी, हीच अंतःकरणपूर्वक इच्छा.

*ॐ सर्वे भवन्तु सुखिनः ।*
*सर्वे सन्तु निरामयाः ।*
*सर्वे भद्राणि पश्यन्तु ।*
*मा कश्चिद् दुःखभाग्भवेत्।*

***ॐ शांतिः शांतिः शांतिः।***

❑



## दीर्घायु हो नातीगोती

*नव्हता संचार*
*होता विचार*
*जपत होतोत नाती!*
*नात्यांचं मोजमाप*
*प्रेमाचा हिसाब*
*फक्त आपल्याच हाती!*

*कोणी काय करावं*
*हे आपणच पहावं*
*शब्दाने शब्द वाढतो*
*त्यापरता मौन धरावं!*

*कालपरत्वे माणूस बदलतो*
*बदलत्या क्षणांचा घेऊन मेळ!*
*भावनांचा होतो फेरफार*
*सुखदुःखांचा विसरतो खेळ!*

*प्रेम, आपुलकी*
*जिव्हाळा दिसते*
*नात्यांची गंमत*
*कुणा सुचते!*

*भावनांच्या कल्लोळात*
*एकटा माणूस*
*खेळतोय आपले खेळ!*
*हाती मोबाईल*
*नाते संपते*
*नाही कुणा वेळ!*

*जपावी संस्कृती, ठेवावी मनःशांती*
*वर्तनात मायेची ठेवावी रेती!*
*जोडावी प्रेमानं घराघरातील ज्योती*
*दीर्घायु हो सारी नातीगोती!*

**– डॉ. विवेक भोगले, नांदेड**